पाणीपुरवठा योजनांच्या सक्षमीकरणासाठी
व शाश्वत अंमलबजावणीसाठी पाणीपट्टीची
आकारणी व वसुली करणेबाबत.....

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः लोलेस-२०१९/प्र.क्र.१११/नवि-३३
मंत्रालय, मुंबई
तारीख: २८ मे, २०१९

वाचा- शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१६/ प्र.क्र.२८/ नवि-३३, दि. १४.०२.२०१७

प्रस्तावना-

नागरी भागामध्ये राबविण्यात येणाऱ्या पाणीपुरवठा प्रकल्पांच्या अंमलबजावणीबाबत कार्यपध्दती संदर्भाधीन शासन निर्णयान्वये विहित केली आहे. त्यानुसार विविध योजनांतर्गत मंजूर पाणीपुरवठा प्रकल्पांची कामे कार्यान्वित झाल्यानंतर योजनांची देखभाल व दुरुस्ती खर्च विचारात घेऊन पाणीपट्टीची आकारणी करण्याबाबत सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

पाणीपुरवठा योजना मंजूर करताना देखभाल दुरुस्तीच्या अनुषंगाने योजना शाश्वत होण्याच्या दृष्टीने डीपीआरला मान्यता देताना डीपीआरमध्ये प्रस्तावित दरानुसार पाणीपट्टीची वसुली करण्यास संबंधित नागरी स्थानिक स्वराज संस्थेमार्फत ठराव करण्यात येतो. तथापि, प्रत्यक्ष योजना मंजूर झाल्यानंतर डीपीआरमध्ये प्रस्तावित केलेल्या दरानुसार व संबंधित नागरी स्थानिक संस्थेने ठराव केलेनुसार व पाणीपट्टीची नियमित आकारणी करण्यात येत नसलेबाबत चर्चा लोकलेखा समितीच्या साक्षीदरम्यान झाली होती.

यास्तव पाणीपुरवठा योजना मंजुरीपूर्वी मान्य केलेल्या ठरावानुसार पाणीपट्टी वसुली करण्याबाबत शासनाकडून सर्व संबंधित नागरी स्थानिक संस्थांना सूचना देणेबाबत शिफारस लोकलेखा समितीने केली होती. याअनुषंगाने सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

नागरी स्थानिक स्वराज संस्थांमार्फत पाणीपुरवठा योजना शाश्वतपणे राबविण्यासाठी व पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी योजनेच्या देखभाल व दुरुस्तीचा खर्च भागविला जाण्याची सुनिश्चिती करणे अत्यावश्यक आहे. त्याकरिता, पाणीपट्टीची आकारणी व वसुली परिणामकारक करणे अत्यावश्यक आहे. त्याकरिता खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. नागरी स्थानिक स्वराज संस्थांमार्फत पाणीपुरवठा प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करताना योजनेच्या देखभाल दुरुस्तीसाठी येणाऱ्या खर्चाची प्रतिपूर्ती होण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती वित्तिय बाब तपासून अनुषंगाने पाणीपट्टीचा वाजवी दर डीपीआरमध्ये प्रस्तावित करण्यात यावा.

२. सदर डीपीआर शासनाच्या योजनेमध्ये सादर करण्यापूर्वी सदरचा डीपीआर हा संबंधित नागरी स्थानिक संस्थेच्या मान्यतेने शासनास सादर करणे अपेक्षित आहे. त्यानुसार सदर योजना मंजूरीबाबतचा ठराव घेताना सदर योजनेसाठी आवश्यक नागरी स्थानिक संस्था हिस्सा उभारणे, सुधारणांची अंमलबजावणी करणे याबरोबरच डीपीआरमध्ये प्रस्तावित केलेल्या पाणीपट्टी दरानुसार पाणीपट्टीची आकारणी व वसुली करणेबाबत निर्णय घेऊन त्याचा समावेश नागरी स्थानिक संस्थेच्या ठरावामध्ये समाविष्ट करावा.

३. नागरी स्थानिक संस्थेने सदर प्रस्ताव शासनाच्या विविध योजनेअंतर्गत किंवा संबंधित नागरी स्थानिक संस्थेच्या निधीतून मंजूरीसाठी सादर केलेनंतर व सदर योजनेस सक्षम प्राधिकरणाकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर, संबंधित नागरी स्थानिक संस्थेने याबाबत केलेल्या ठरावानुसार पाणीपट्टीच्या दराची आकारणी व वसुली करणे संबंधित नागरी स्थानिक स्वराज संस्थेवर बंधनकारक राहील. तसेच वाया जाणाऱ्या पाण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी सकारात्मक उपाययोजना करणेदखील बंधनकारक राहील.

४. संबंधित नागरी स्थानिक स्वराज संस्थेने पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यापूर्वी केलेल्या ठरावानुसार निश्चित केलेल्या दरानुसार पाणीपट्टीची आकारणी व वसुली करणेबाबतची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित आयुक्त, महानगरपालिका / मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत यांची राहील.

५. महाराष्ट्र नगरपरिषदा , नगरपंचायती व औद्यागिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम ७७ (अअ) नुसार राज्य शासनाच्या या धोरणाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही संबंधित मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत यांच्यावर राहील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०५२८१५४८५०११२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pandurang Jotiba Jadhav

Digitally signed by Pandurang Jotiba Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=300d785e12fdc19db0612f1ffdf83e54efe7da2b1bc63d18df8e09b3c7eece65, cn=Pandurang Jotiba Jadhav
Date: 2019.06.01 17:40:08 +05'30'

(पां.जो.जाधव)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई.

२. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई

३. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई.
४. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,वरळी,मुंबई.
५. विभागीय आयुक्त (सर्व)
६. जिल्हाधिकारी (सर्व)
७. आयुक्त सर्व महानगरपालिका
८. मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषद/नगरपंचायती